**MHKO120001452015**

<u>नियमित दिवाणी दावा क्र.३२/२०१५</u>
(CNR No.MHKO120001452015)

## <u>निशाणी क्र.११८ खाली आदेश</u>

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.२ - बाळकृष्ण नारायण शेटी यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. वादी यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र.२ - बाळकृष्ण नारायण शेटी हे दि.०८/०६/२०२३ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे, प्रकरण गुणदोषांवर चालविण्यासाठी मयत प्रतिवादी क्र.२ - बाळकृष्ण नारायण शेटी यांचे वारस अभिलेखावर येणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

०२. प्रस्तुत अर्जावर यातील प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सादर करून सदर अर्जावर तीव्र आक्षेप नोंदवला. प्रतिवादीच्या कथनानुसार, प्रतिवादी मयत झालेनंतर त्यांना अर्जातील नमुद वारस असलेबद्दल योग्य ती कागदपत्रे हजर न केलेने सदर अर्ज नामंजूर करणेची त्यांनी विनंती केली.

०३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.२ - बाळकृष्ण नारायण शेटी हे दि.०८/०६/२०२३ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुत दावा वादी यांनी प्रतिवादींच्या विरुध्द वाटणीसाठी, स्वतंत्र कब्जासाठी, हक्कज्ञापन व मनाईसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरण हे गुणदोषांवर निर्गमित करण्यासाठी, मयत प्रतिवादी क्र.२ - बाळकृष्ण नारायण शेटी यांचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. तसेच, प्रस्तुत अर्ज हा मुदतीमध्ये सादर केला असल्यामुळे, मी पुढीलप्रमाणे आदेश करत आहे.

# <u>आदेश</u>

१. निशाणी क्र.११८ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत दाव्यात दुरुस्ती करून मयत प्रतिवादी क्र.२ - बाळकृष्ण नारायण शेटी यांचे वारस अभिलेखावर नोंदवून घ्यावेत.

३. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर सादर करावी.

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2023.11.06 15:11:21 +0530

दिनांक. ०६/११/२०२३. **( व्ही. बी. मुल्ला )**
ठिकाण. गारगोटी. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी.